# पुरवठा आयुक्त कार्यालय

**मुंबई पोर्ट ट्रस्ट, जी.डब्ल्यु.एन.डी.ऑफिस, तळमजला, कॉटन ग्रीन स्थानका जवळ, काळाचौकी, मुंबई-४०००३३.**

**दुरध्वनी क्रमांक** :- ०२२-२३७२१९१२, ०२२-२३७२६६१३ व ०२२-२३७२८९३८

**ई-मेल** :- supplycommissioneroffice@yahoo.com

**सार्वजनिक तक्रार निवारण प्रणाली टोल फ्री क्रमांक :- १८००-२२-४९५०.**


क्रमांक/पुआका/नोशा/२०१९/का.वा.निर्लेखन/प्र.क्रं.५७४/ कक्ष-३ दिनांक २९ जानेवारी, २०२१

प्रति,

कक्ष अधीकारी , संगणक कक्ष
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ,
मंत्रालय, मुंबई- ४००० ३२

विषय : निविदा (आमंत्रणपत्र ) व प्रपत्र —अ प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

पुरवठा आयुक्त कार्यालयाचे विभाग प्रमुख मा. सह सचिव व संचालक, नागरी पुरवठा यांच्या वापराकरीता असलेले वाहनाची विल्हेवाट लावण्याकरीता निविदा मागविण्याकरीता सोबतचे निविदा (आमंत्रण पत्र) व प्रपत्र- अ आपल्या विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही, विनंती.

सं.मा.जाधव

( सं. मा. जाधव )
उप संचालक, नागरी पुरवठा,
महाराष्ट्र शासन.

## प्रपत्र-अ

## अटी व शर्ती

१)मोहरबंद लिफाफयावर वाहनाच्या विल्हेवाटीबाबतचे दरपत्रक असे लिहिणे आवश्यक आहे.

२)दर पत्रक सादर करावयाचे ठिकाण :- **पुरवठा आयुक्तांचे कार्याल, मुंबई पोर्ट ट्रस्ट,जी.डब्ल्यु.एन.डी.ऑफिस, तळमजला, कॉटन ग्रीन स्थानका जवळ, काळाचौकी, मुंबई-४०००३३.**

**दुरध्वनी क्रमांक** :- ०२२-२३७२२९७० ,०२२-२३७२ ६६१३,२२-२३७२८९३८
**ई-मेल** :- supplycommissioneroffice@yahoo.com
**सार्वजनिक तक्रार निवारण प्रणाली टोल फ्री क्रमांक** :- १८००-२२-४९५०.

---

३) प्राप्त दर पत्रक दिनांक २८ जानेवारी,२०२१ रोजी दुपारी ठिक २.०० वाजेपर्यंत पुरवठा आयुक्तांचे कार्याल, **मुंबई पोर्ट ट्रस्ट ,जी.डब्ल्यु.एन.डी.ऑफिस, तळमजला, कॉटन ग्रीन स्थानका जवळ, काळाचौकी, मुंबई-४०००३३.** येथे पोस्टाने अथवा स्वत:हा पाठविण्यात यावे. तसेच दर पत्रक त्याच दिवसी दिनांक २८ जानेवारी, २०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील. निविदा उघडत्यावेळी निविदाकार किंवा त्याचा उप्रतिनिधी व कार्यालयाच्या समितीसमोर निविदा उघडण्यात येतील.

४) दरपत्रकात लिफाफयात खालील कागदपत्रे सादर करावीत.
 अ) आस्थापना व दुकाने अधिनियम लायसन्स प्रमाणपत्राची प्रत
 ब) दर पत्रक अंतिम तारखेपर्यंत ग्राहय असलेले आयकर भरण्याचोसबधिचे प्रमाणपत्राची प्रत/ तसेच मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र.क) पॅनकार्डची प्रत ड) G.S.T नोदणी प्रमाणपत्राची प्रत इ) G.S.T. भरल्याचे विवरणपत्र

५) निविदाकाराने सदर वाहन चालविण्यासाठी घेण्यात येवू नयेत. सदर वाहन भंगार म्हणूनच घेण्यात यावे.

६) दर पत्रक सादर करताना लिफाफा सिलबंद करुन सादर करावा.

७) दरपत्रकासोबत सदर प्रक्रीयेतील खरेदी प्राधिका-यांबरोबर निविदाकाराचा व त्यांच्या संसथेचा कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही, अशी हमी निविदाकारानी देणे आवश्यक आहे.

८) कोणतीही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा हक्क कार्यालयाचे विभाग प्रमुख मा. सह सचिव व संचालक, नागरी पुरवठा याना राखून ठेवत आहे.

९) दरपत्रक सादर करणा-या प्रत्येक पुरवठादाराचे स्व:ताचे कायदेशिर आस्तित्व असावे. त्याच्यात कोणताही हितसंबंधाचा संघर्ष असता कामा नयेत.

१०) वेगवेगळया दोन किंवा तीन कंपनीकडून दरपत्रक सादर करीत असताना जर या कंपनीचा पुरवठादार एकच असेल तर सदर प्रक्रियेत त्या पुरवठादारास भाग घेता येणार नाही.

११) प्रत्येक पुरवठादारचे फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

१२) सदर वाहन जसे आहेत तसेच निविदाकारास देण्यात येईल त्या कोणताच फेरबदल करण्यात येणार नाही.

१३) सदर वाहन निविदेमधील ज्याची किंमत जास्त असेल त्यांनाच सदर वाहन विल्हेवाटीसाठी देण्यात येईल

---